# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सार्वजनिक बांधकाम/ विद्युत विभाग

दि. २२/०८/२०२५

## // गोषवारा //

प्रकरण क्र ( २९४ ) ठाणे-घोडबंदर रस्त्यावरील राज्यमार्ग क्र.८४ स.क्र.०/००० ते ४/४०० कि.मी. रस्त्याचे दुरूस्ती करणे. (ई- ३९०३३०)

उपरोक्त विषयान्वये ठाणे घोडबंदर राज्यमार्ग क्र.८४ स.क्र.०/००० ते ४/४०० कि.मी हा एकुण ४.४० कि.मी लांबीचा रस्ता अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांचे कडील जा.क्र.अअ/ठामं/प्रशा-१/३८९९ दि.२१/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये आणि शासन निर्णय क्रमांक:-रवियो-२०२४/प्र.क्र.५४/नियोजन-२ दि.०३ जानेवारी २०२५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आला आहे. सदर रस्ता मोठया प्रमाणात नादुरुस्त असुन यापुढे सदर रस्त्याची मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत देखभाल दुरुस्ती करावयाची आहे.

सदर रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ६० मी. रुंद करुन कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. सदर कामी सदर रस्त्याच्या जागेचे भुसंपादन, वनविभागाची जागा हस्तांतरीत करणे, इको-सेनसिटीव्ह झोन परवानगी, कांदळवन कक्ष परवानगी, मा.उच्च न्यायालय परवानगी इत्यादी कामा करीता बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळयापुर्वी सदर रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदर रस्त्यावर अपघात होत असल्याने रस्ता वाहतूकीस सुव्यवस्थित राहण्यासाठी लेन मार्किंग व कॅट आय रोड रिफ्लेक्टर इ. तातडीने करणे आवश्यक आहे. त्याकरीता टप्प्याटप्प्याने अंदाजपत्रक तयार करण्यात आली असून मा. आयुथ्त यांनी रु.४,९६,७७,५००/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास मंजुरी दिली आहे.

सदर कामांच्या खर्चाची तरतुद सन २०२५-२६ वर्षाच्या "सार्व. रस्ते देखभाल/दुरुस्ती/पुर्नपृष्ठीकरण करणे" या लेखाशिर्षात रु.५५००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दि.२६ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

सदर रस्ता मनपाकडे नव्याने हस्तांतरीत झाल्याने सदर कामावर प्रस्तावित केल्यानुसार दुरूस्तीची कामे करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक :- २२|०८|२०२५

प्रकरण क्रमांक :- (२१४) ठाणे-घोडबंदर रस्त्यावरील राज्यमार्ग क्र.८४ स.क्र.०/००० ते ४/४०० कि.मी. रस्त्याचे दुरूस्ती करणे. (ई- ३९०३३०)

ठराव क्रमांक :- (२१४)

उपरोक्त विषयान्वये ठाणे घोडबंदर राज्यमार्ग क्र.८४ स.क्र.०/००० ते ४/४०० कि.मी हा एकुण ४.४० कि.मी लांबीचा रस्ता अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांचे कडील जा.क्र.अअ/ठामं/प्रशा-१/३८९९ दि.२१/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये आणि शासन निर्णय क्रमांक:-रवियो-२०२४/प्र.क्र.५४/नियोजन-२ दि.०३ जानेवारी २०२५ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आला आहे. सदर रस्ता मोठया प्रमाणात नादुरुस्त असुन यापुढे सदर रस्त्याची मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत देखभाल दुरुस्ती करावयाची आहे.

सदर रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ६० मी. रुंद करुन कॉक्रीटीकरण करण्यात येणार आहे. सदर कामी सदर रस्त्याच्या जागेचे भुसंपादन, वनविभागाची जागा हस्तांतरीत करणे, इको-सेनसिटीव्ह झोन परवानगी, कांदळवन कक्ष परवानगी, मा.उच्च न्यायालय परवानगी इत्यादी कामा करीता बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे पावसाळयापुर्वी सदर रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदर रस्त्यावर अपघात होत असल्याने रस्ता वाहतूकीस सुव्यवस्थित राहण्यासाठी लेन मार्किंग व कॅट आय रोड रिफ्लेक्टर इ. तातडीने करणे आवश्यक आहे. त्याकरीता टप्प्याटप्प्याने अंदाजपत्रक तयार करण्यात आली असून मा. आयुथ्त यांनी रु.४,९६,७७,५००/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास मंजुरी दिली आहे.

सदर कामांच्या खर्चाची तरतुद सन २०२५-२६ वर्षाच्या "सार्व. रस्ते देखभाल/दुरुस्ती/पुर्नपृष्ठीकरण करणे" या लेखाशिर्षात रु.५५००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अ. शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन रू.४,९६,७७,५००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम/ विद्युत विभाग

## दि. २२/ ०८/२०२५

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक.(२९५)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा प्रकल्पासाठी DEA Empaneled Transaction Adviser यांच्याकडील मान्यता प्राप्त सल्लागार मधून प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे. (ई-2172562)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत 450 टन घनकचरा निर्माण होत आहे. निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर उत्तन येथील प्रकल्पामध्ये प्रक्रीया करण्यात येत आहे. मिरा भाईंदर शहर बृहन्मुंबई लगत असल्याने शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून मिरा भाईंदर शहराचे शहरीकरण वेगाने वाढत आहे. वेगाने वाढलेल्या शहरीकरणामुळे शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यामध्ये वाढ होत आहे. सद्यस्थितीमध्ये फक्त उत्तन येथील मे. सौराष्ट्र इन्वायरो प्रोजेक्ट प्रा. लि. यांचेमार्फत उभारण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये 400 ते 450 टन घन कचऱ्यावर प्रक्रीया करण्यात येत आहे. उत्तन येथे 31 हेक्टर इतकी जागा उपलब्ध आहे. मे. सौराष्ट्र इन्वायरो प्रोजेक्ट प्रा. लि. यांना कचऱ्यावर प्रक्रीयाकरण्यासाठी देण्यात आलेल्या कामाची मुदत सन 2026 मध्ये संपुष्टात येणार आहे.

सध्याच्या कचरा व्यवस्थापन पद्धतींमध्ये प्रामुख्याने शहरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे संकलन, वाहतूक आणि डंपिंग ग्राउंडवर विल्हेवाट लावणे समाविष्ट आहे. शहरामध्ये निर्माण होणाऱ्या घातक कचऱ्यावर कोणतीही प्रक्रीया करण्यात येत नाही. ज्यामुळे जमीन प्रदूषण, उघड्यावर जाळण्यामुळे होणारे वायू प्रदूषण आणि लीचेटमुळे होणारे भूजल दूषित होत आहे.

सध्या, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कचरा व्यवस्थापन प्रणाली प्रामुख्याने विकेंद्रित संकलन प्रणालीवर आणि नियुक्त केलेल्या विल्हेवाटीच्या ठिकाणी कचरा वाहून नेण्यावर अवलंबून आहे, ज्यामध्ये पुरेशी शास्त्रोक्त व वैज्ञानिक प्रक्रियाचा अभाव आहे. कचरा वर्गीकरण, कंपोस्टिंग, पुनर्वापर किंवा कचऱ्या पासून ऊर्जा मध्ये रूपांतरणासाठी कोणतीही एकात्मिक सुविधा नाही. या परिस्थितीत आधुनिक ISWM सुविधा विकसित करणे आवश्यक आहे.

स्वच्छ भारत अभियान आणि घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016, 2024 नुसार, मटेरियल रिकव्हरी सुविधा, त्यानंतर वेस्ट टू एनर्जी, बायो-चार प्लांट, ऑरगॅनिक वेस्ट टू बायो-सीएनजी प्लांट इत्यादी सारख्या व्यापक आणि वैज्ञानिकदृष्ट्या सक्षम एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन (ISWM) प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. अशा प्रकल्पामुळे महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची शास्त्रोक्त व वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावणे शक्य होईल. त्यामळे पर्यायावरणाची होणारी हानी थांबविता येईल. तसेच

उत्तन येथील 31 हेक्टर इतकी जागा उपलब्ध आहे. सद्यस्थिती मध्ये सदर जागेमध्ये एकच मोठा प्रकल्प सुरू आहे. सदर जागेचे व्यवस्थितरीत्या नियोजन करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मिरा भाईंदर शहरामध्ये नविन प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे आवश्यक असून खालील प्रमाणे प्रकल्प सल्लागार यांचे कडून कामे करून घेण्यात येतील.

- संकल्पनात्मक/व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी सेवा प्रदान करणे
- प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे.
- पीपीपी प्रकल्पांसह पायाभूत सुविधा प्रकल्प तयार करणे.
- प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी केंद्र शासन, राज्य शासन यांचेशी पत्रव्यवहार करून निधी उपलब्ध करून देणे.
- विविध प्रकल्प राबविताना प्रकल्पावर दैनंदिन देखभाल करणे.

सदर कामांच्या खर्चाची तरतुद "मुलभूत सुविधा- विशेष अनुदान (शासन अनुदान)" या लेखाशिर्षकातून करण्यात आली आहे व प्रकल्प सल्लागार यांना देण्यात येणारी फी ही शासनाच्या प्राप्त होणाऱ्या अनुदानामधून देण्यात येणार आहे. तरी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा प्रकल्पासाठी DEA Empaneled Transaction Adviser यांच्याकडील मान्यता प्राप्त सल्लागार मधून प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणेकरीता निविदा मागविण्यास व सदर कामी होणाऱ्या रु.30.00 कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-5/2025-26/DK/MG-9

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. २०/०८/२०२५ वेळ ५.२५ pm
रजिस्टर नोंद अ. क्र. 222 वर्ष २०२५-२६

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक २२/०८/२०२५

**प्रकरण क्रमांक :-(** २७५ **)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा प्रकल्पासाठी DEA Empaneled Transaction Adviser यांच्याकडील मान्यता प्राप्त सल्लागार मधून प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे. (ई-2172562)

**ठराव क्रमांक :- (** २७५ **)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत 450 टन घनकचरा निर्माण होत आहे. निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर उत्तन येथील प्रकल्पामध्ये प्रक्रीया करण्यात येत आहे. मिरा भाईंदर शहर बृहन्मुंबई लगत असल्याने शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून मिरा भाईंदर शहराचे शहरीकरण वेगाने वाढत आहे. वेगाने वाढलेल्या शहरीकरणामुळे शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यामध्ये वाढ होत आहे. सद्यस्थितीमध्ये फक्त उत्तन येथील मे. सौराष्ट्र इन्वायरो प्रोजेक्ट प्रा. लि. यांचेमार्फत उभारण्यात आलेल्या प्रकल्पामध्ये 400 ते 450 टन घन कचऱ्यावर प्रक्रीया करण्यात येत आहे. उत्तन येथे 31 हेक्टर इतकी जागा उपलब्ध आहे. मे. सौराष्ट्र इन्वायरो प्रोजेक्ट प्रा. लि. यांना कचऱ्यावर प्रक्रीयाकरण्यासाठी देण्यात आलेल्या कामाची मुदत सन 2026 मध्ये संपुष्टात येणार आहे.

सध्याच्या कचरा व्यवस्थापन पद्धतींमध्ये प्रामुख्याने शहरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे संकलन, वाहतूक आणि डंपिंग ग्राउंडवर विल्हेवाट लावणे समाविष्ट आहे. शहरामध्ये निर्माण होणाऱ्या घातक कचऱ्यावर कोणतीही प्रक्रीया करण्यात येत नाही. ज्यामुळे जमीन प्रदूषण, उघड्यावर जाळण्यामुळे होणारे वायू प्रदूषण आणि लीचेटमुळे होणारे भूजल दूषित होत आहे.

सध्या, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कचरा व्यवस्थापन प्रणाली प्रामुख्याने विकेंद्रित संकलन प्रणालीवर आणि नियुक्त केलेल्या विल्हेवाटीच्या ठिकाणी कचरा वाहून नेण्यावर अवलंबून आहे, ज्यामध्ये पुरेशी शास्त्रोक्त व वैज्ञानिक प्रक्रियाचा अभाव आहे. कचरा वर्गीकरण, कंपोस्टिंग, पुनर्वापर किंवा कचऱ्या पासून ऊर्जा मध्ये रूपांतरणासाठी कोणतीही एकात्मिक सुविधा नाही. या परिस्थितीत आधुनिक ISWM सुविधा विकसित करणे आवश्यक आहे.

स्वच्छ भारत अभियान आणि घनकचरा व्यवस्थापन नियम, 2016, 2024 नुसार, मटेरियल रिकव्हरी सुविधा, त्यानंतर वेस्ट टू एनर्जी, बायो-चार प्लांट, ऑरगॅनिक वेस्ट टू बायो-सीएनजी प्लांट इत्यादी सारख्या व्यापक आणि वैज्ञानिकदृष्ट्या सक्षम एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन (ISWM) प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. अशा प्रकल्पामुळे महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची शास्त्रोक्त व वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावणे शक्य होईल. त्यामुळे पर्यायावरणाची होणारी हानी थांबविता येईल. तसेच उत्तन येथील 31 हेक्टर इतकी

जागा उपलब्ध आहे. सद्यस्थिती मध्ये सदर जागेमध्ये एकच मोठा प्रकल्प सुरू आहे. सदर जागेचे व्यवस्थितरीत्या नियोजन करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मिरा भाईंदर शहरामध्ये नविन प्रकल्प राबविण्यासाठी प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे आवश्यक असून खालील प्रमाणे प्रकल्प सल्लागार यांचे कडून कामे करून घेण्यात येतील.

- संकल्पनात्मक/व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी सेवा प्रदान करणे
- प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे.
- पीपीपी प्रकल्पांसह पायाभूत सुविधा प्रकल्प तयार करणे.
- प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी केंद्र शासन, राज्य शासन यांचेशी पत्रव्यवहार करून निधी उपलब्ध करून देणे.
- विविध प्रकल्प राबविताना प्रकल्पावर दैनंदिन देखभाल करणे.

सदर कामांच्या खर्चाची तरतुद "मुलभूत सुविधा- विशेष अनुदान (शासन अनुदान)" या लेखाशिर्षकातून करण्यात आली आहे व प्रकल्प सल्लागार यांना देण्यात येणारी फी ही शासनाच्या प्राप्त होणाऱ्या अनुदानामधून देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद अ. शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा प्रकल्पासाठी DEA Empaneled Transaction Adviser यांच्याकडील मान्यता प्राप्त सल्लागार मधून प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणेकरीता निविदा मागविण्यास व सदर कामी होणाऱ्या रु.30.00 कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(राधाबिनोद अ. शर्मा, भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

दि. २२/०८/२०२५

// गोषवारा //

**प्रकरण क्र. (२१६) :- निविदेस मान्यता देणेबाबत.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करणे.**

**(अंदाजित खर्च रु.९६,१०,०००/-) (टेंडर आयडी १२०४७६८_१)**

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | १२०४७६८_१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करणे | रु.९६,१०,०००/- | **मे. एम.बी. ब्रदर्स**<br>मे. मधुराणी इंटप्रायजेस | **५.२७००% कमी दराने**<br>४.०० % कमी दराने |

वरील कामी **मे. एम.बी. ब्रदर्स** या निविदाधारकाने **५.२७००% कमी दराने** निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दि.२६ ऑगस्ट २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील कामांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक २२|०९|२०२५

**प्रकरण क्र. ( २१६ ) :- निविदेस मान्यता देणेबाबत.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करणे.**

**(अंदाजित खर्च रु.९६,१०,०००/-) (टेंडर आयडी १२०४७६८_१)**

ठराव क्र. ( २१६ )

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | १२०४७६८_१ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात गणपती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करणे | रु.९६,१०,०००/- | **मे. एम.बी. ब्रदर्स**<br>मे. मधुराणी इंटप्रायजेस | **५.२७००%** कमी दराने<br>४.०० % कमी दराने |

वरील कामी **मे. एम.बी. ब्रदर्स** या निविदाधारकाने **५.२७००% कमी दराने** निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राधाबिनोद शर्मा, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन

वरील कामाच्या **मे. एम.बी. ब्रदर्स** या निविदाधारकाने सादर केलेल्या **५.२७००% कमी दराने** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भाप्रसे)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-8/25-26PC-8/25-26/DK/PT-45

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम / विद्युत विभाग

## दि. 22 / 08 / 2025

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( 298 ) : - मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल बसविणे.
(ई ऑफीस क्र.337396)

वरील संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी मे. अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. यांच्या समवेत नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणेकामी पहाणी करण्यात आलेली आहे. त्या अनुशंगाने खालील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र | ठिकाणाचे नाव | स्ट्रीट लाईट पोल संख्या | लाईट वॅटेज क्षमता | प्रस्ताव क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1) | माशाचा पाडा नविन डी.पी. रोड काशिमिरा | 14 Nos | 105W LED | MBD/ME/009/2025-26 Date-25/07/2025 |
| 2) | जे.पी.इन्फ्रा रोड मिरारोड (पू.) | 04 Nos | 105W LED | MBD/BE/016/2025-26 Date-25/07/2025 |
| 3) | रायकरवाडी मिरारोड (पू.) | 01 Nos | 170W LED | MBD/ME/008/2025-26 Date-25/07/2025 |
| 4) | हनुमान नगर भाईंदर (पू.) | 02 Nos | 50W LED | MBD/BE/014/2025-26 Date-25/07/2025 |
| 5) | पॉश कॉम्प्लेक्स मिरारोड (पू.) | 02 Nos | 105W LED | MBD/BE/015/2025-26 Date-25/07/2025 |
| 6) | बालाजी नगर भाईंदर (प.) | 04 Nos | 105W LED | MBD/BW/008/2025-26 Date-25/07/2025 |
| 7) | टिपु सुलतान चौक मिरारोड (पू.) | 01 Nos | 170W LED | MBD/ME/007/2025-26 Date-25/07/2025 |
| 8) | माशाचा पाडा नविन डी.पी. रोड | 31 Nos | 105W LED | MBD/ME/006/2025-26 Date-25/07/2025 |
| 9) | उत्तन डोंगरी | 06 Nos | 105W LED | MBD/BW/009/2025-26 Date-25/07/2025 |
| 10) | प्लेझंट पार्क रोड मिरारोड (पू.) | 15 Nos | 170W LED | MBD/ME/010/2025-26 Date-29/07/2025 |
| 11) | उत्तन वेलंकनी चर्च रोड | 06 Nos | 170W LED | MBD/BW/010/2025-26 Date-29/07/2025 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12) | सुविधा पार्क रोड मिरारोड (पू.) | 17Nos | 105W<br>LED | MBD/ME/011/2025-26<br>Date-29/07/2025 |

सदर ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणेसाठी मे. अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. यांना कार्यादेश देणेकामी मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-03/2025-26/PJ/गोषवारा/-07

प्रशासकीय
मा. ~~महासभा~~ / ~~स्थायी समिती~~ सभा
गोषवारा प्राप्त दि. 29/08/2025 वेळ दु. 3.25 वा.
विषय सूची अ.क्र. 224 वर्ष 2025-26

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. दिनांक :२२ / ०८/२०२५

| प्रकरण क्रमांक ( ) : - २१८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल बसविणे. (ई ऑफीस क्र.337396) |
|---|---|
| ठराव क्र. (" ) :- २१८ | |

वरील संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी मे. अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. यांच्या समवेत नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणेकामी पहाणी करण्यात आलेली आहे. त्या अनुशंगाने खालील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत

| अ.क्र | ठिकाणाचे नाव | स्ट्रीट लाईट पोल संख्या | लाईट वॅटेज क्षमता | प्रस्ताव क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1) | माशाचा पाडा नविन डी.पी. रोड काशिमिरा | 14 Nos | 105W LED | MBD/ME/009/2025-26 Date-25/07/2025 |
| 2) | जे.पी.इन्फ्रा रोड मिरारोड (पू.) | 04 Nos | 105W LED | MBD/BE/016/2025-26 Date-25/07/2025 |
| 3) | रायकरवाडी मिरारोड (पू.) | 01 Nos | 170W LED | MBD/ME/008/2025-26 Date-25/07/2025 |
| 4) | हनुमान नगर भाईंदर (पू.) | 02 Nos | 50W LED | MBD/BE/014/2025-26 Date-25/07/2025 |
| 5) | पॉश कॉम्प्लेक्स मिरारोड (पू.) | 02 Nos | 105W LED | MBD/BE/015/2025-26 Date-25/07/2025 |
| 6) | बालाजी नगर भाईंदर (प.) | 04 Nos | 105W LED | MBD/BW/008/2025-26 Date-25/07/2025 |
| 7) | टिपु सुलतान चौक मिरारोड (पू.) | 01 Nos | 170W LED | MBD/ME/007/2025-26 Date-25/07/2025 |
| 8) | माशाचा पाडा नविन डी.पी. रोड | 31 Nos | 105W LED | MBD/ME/006/2025-26 Date-25/07/2025 |
| 9) | उत्तन डोंगरी | 06 Nos | 105W LED | MBD/BW/009/2025-26 Date-25/07/2025 |
| 10) | प्लेझंट पार्क रोड मिरारोड (पू.) | 15 Nos | 170W LED | MBD/ME/010/2025-26 Date-29/07/2025 |
| 11) | उत्तन वेलंकनी चर्च रोड | 06 Nos | 170W LED | MBD/BW/010/2025-26 Date-29/07/2025 |
| 12) | सुविधा पार्क रोड मिरारोड (पू.) | 17Nos | 105W LED | MBD/ME/011/2025-26 Date-29/07/2025 |

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/ प्र.क्र.71(भाग-21)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषतः कलम 452 अ चा (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार मी,श्री.राधाबिनोद अ. शर्मा, प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील

सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल बसविणेकामी मे. अदानी इलेक्ट्रीसिटी कं.लि यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(श्री. राधाबिनोद अ.शर्मा, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम / विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-03/2025-26/PJ/ठराव -07